# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६०९४७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in


क्र.संगाबाअवि/१३/विवि/८५/२०२०
दिनांक : २१.११.२०२०

प्रति,
**मा.प्राचार्य,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषय : विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करणेबाबत.**

**संदर्भ** : १) या विभागाचे पत्र क्र.संगाबाअवि/१३/१७३/२०१८ दिनांक १७.११.२०१८
२) या विभागाचे पत्र क्र.संगाबाअवि/१३/४७/२०१९ दिनांक ०७.०३.२०१९
३) या विभागाचे पत्र क्र.संगाबाअवि/१३/५८/२०१९ दिनांक ०४.०४.२०१९
४) या विभागाचे पत्र क्र.संगाबाअवि/१३/६०/२०१९ दिनांक ०८.०४.२०१९
५) या विभागाचे पत्र क्र.संगाबाअवि/१३/१०१/२०१९ दिनांक ०६.०७.२०१९
६) या विभागाचे पत्र क्र.संगाबाअवि/१३/०७/२०२० दिनांक : ०७.०१.२०२०

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भाकित पत्रानुसार विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यासंदर्भात वारंवार आपल्या महाविद्यालयाला कळविण्यात आले असून अद्यापपावेतो काही महाविद्यालयांनी वरिल कक्षाची स्थापना केलेली नाही असे निदर्शनास आले. यासंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०८(१)(क) तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरुप परिनियम क्र.१/२०१९ नुसार महाविद्यालय शिक्षेस पात्र असेल.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुद क्रमांक ५६(२)(ख) नुसार प्रत्येक महाविद्यालयामध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे कायद्याच्या दृष्टिने अनिवार्य आहे. संबंधित कक्षाचे माध्यमातून विद्यार्थी आपल्या तक्रारी महाविद्यालयाकडे करु शकतात. तसेच विद्यापीठ विरुध्दच्या तक्रारींच्या आणि महाविद्यालय तक्रार निवारण कक्षाकडून निर्णय न देण्यात आलेल्या तक्रारींच्या बाबतीत त्या तक्रारी विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाकडे निर्देशित करण्यात येतात.

विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन झाल्यानंतर कक्षामध्ये समावेश करण्यात आलेल्या सदस्यांची माहिती ही ऑनलाईनद्वारे भरावयाची आहे. साफ्टवेअर हाताळण्याचे संदर्भातील सविस्तर माहिती ही आपणास पुनःश्च आपल्या सुलभ संदर्भाकरीता सोबत पाठविण्यात येत आहे.

आपणांस पुनःश्च विनंती करण्यात येते की, विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करुन तातडीने विद्यार्थी विकास विभागाच्या Online पोर्टलवर विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाची माहिती पाठवावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ.दिनेशकुमार सातंगे)**
संचालक,
विद्यार्थी विकास
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**सहपत्र : १) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब दिनांक २७.०२.२०१९**
**२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुद क्रमांक ५६**

**टिप : सोबत जोडलेल्या यादीतील महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन केलेला असल्यामुळे त्या महाविद्यालयांनी हे पत्र ग्राह्य धरु नये.**

प्रतिलिपी :
०१. मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
०२. प्र.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.